दुरध्वनी क्र. ०२०-२६३० ६१००
Email : edmkvdcpune@gmail.com /
edmkvdc.punewrd@maharashtra.gov.in

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
सिंचन भवन,मंगळवार पेठ,पुणे-११

**वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.**

महामंडळ निर्णय क्रमांक : मकृखोविम/२०७/(५६१/२००७)/प्रबां-२/सुप्रमा/०५४८
दिनांक : २५/०१/२०२२

**पहा :** शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१५ / (३५/२०१५) जसं(आ) मंत्रालय, मुंबई ३२, दि. ९ सप्टेंबर २०१५.

**प्रस्तावना :**

वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या योजनेस शासन निर्णय क्र. लपात /१००१/(६६/२००१)/लपा-१ दिनांक १८/०३/२००२ अन्वये दरसूची १९९९-२००० वर आधारीत रुपये १५५.१३ लक्ष किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान प्रदान केलेली आहे.

भूसंपादन, पुनर्वसन, दरसुची, निविदा शर्तीनुसार अदा केलेली भाववाढ व अपुऱ्या तरतुदी इत्यादी कारणामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होत असल्यामुळे योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे.

संदर्भिय शासन निर्णयान्वये सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार विदर्भ व मराठवाडयातील प्रकल्पांची कामे असणाऱ्या महामंडळांना देण्यात आलेले आहेत. या मध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास अधिकार प्राप्त आहेत.

या प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय सल्लागार समिती -२ पुणे यांनी दि.१७/०३/२०२० रोजी झालेल्या ४० व्या बैठकीत रु. ५५५.२० लक्ष किंमतीस मुल्यार्पण (Vetting) देणे बाबतचा निर्णय झालेला आहे. अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली, अतिरिक्त मुख्य सचिव (नियोजन) आणि अतिरिक्त मुख्य सचिव (जलसंपदा) या सदस्यांच्या उपस्थितीत दिनांक १५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीमध्ये या प्रकल्पास सुप्रमा देण्यासाठी नियामक मंडळासमोर निर्णयार्थ सादर करण्यासाठी सहमती दर्शविण्यात आली आहे.

त्यानुसार वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणेच्या दि. १२/११/२०२१ रोजी झालेल्या १०७ व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चेसाठी सादर करण्यात आला. सदर बैठकी मध्ये वसंतवाडी) साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्तावावर चर्चा होवुन, ठराव क्र. १०७/६ अन्वये मान्यता दिली. सदर ठराव खालील प्रमाणे आहे.

**ठराव क्र.१०७/६ : "ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१५/ (३५/२०१५)/जसं (आ) दिनांक ९/९/२०१५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार, राज्य तांत्रिक सल्लागार समिती, क्र. २ पुणे यांच्या दि. १७/०३/२०२० रोजी झालेल्या ४० व्या बैठकीत मुल्यार्पण (Vetting) अहवाल अंतिम करण्यास केलेल्या शिफारशीनुसार व सचिव स्तरावरील उपसमितीच्या दि. १५/०७/२०२१ रोजी मंत्रालय मुंबई येथे झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार तसेच राज्य तांत्रिक सल्लागार समिती, क्र. २ पुणे यांच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. ६ ची पूर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे राज्य तांत्रिक सल्लागार समितीने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणेच्या अटी अधीन वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या योजनेच्या दरसुची २००७-२००८ वर आधारित रु. ५५५.२० लक्ष किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

राज्य तांत्रिक सल्लागार समिती, क्र. २ पुणे यांच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. ६ ची पूर्तता मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग पुणे यांनी पत्र क्र. ००७६ दिनांक १०/०१/२०२२ अन्वये महामंडळास सादर केलेली आहे. त्यानुसार दि. १२/११/२०२१ रोजी झालेल्या १०७ व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता मिळालेल्या उपरोक्त ठरावानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**महामंडळ निर्णय :**

महामंडळाच्या या निर्णयान्वये वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या योजनेचा एकुण अंदाजित खर्च रुपये ५५५.२० लक्ष ( रुपये पाच कोटी पंचावन्न लक्ष वीस हजार फक्त ) या किंमतीस खालील अटींचे अधीन राहून प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापैकी रुपये ५५५.२० लक्ष कामाप्रीत्यर्थ व रुपये निरंक लक्ष अनुषंगीक खर्च आहे.

अटी – १) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार व सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

२) प्रकल्पाचे संपूर्ण लाभक्षेत्र अधिसुचीत करणे, तसेच संपूर्ण लाभक्षेत्रामध्ये पाणीवापर संस्था स्थापन करून सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करावे.

३) सदर योजनेसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर सुधारीत प्रसासकीय मान्यतेच्या बाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही.

४) सदर प्रकल्पासंदर्भात आधीच्या कालावधीमध्ये जर काही आर्थिक व कार्यपध्दतीत अनियमितता झाल्या असतील, कोणतीही नियमबाह्य कार्यवाही करण्यात आली असेल अथवा ज्यामुळे आर्थिक घोटाळा निर्माण होण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही बाबींना सहमती आहे, असे गृहीत धरता येणार नाही.

५) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील मुद्या क्र. ६ ची पूर्तता करावी.

६) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यातेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.

७) प्रकल्पाची सर्व कामे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

उपशिर्षवार तरतूदीचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | उपशिर्षवार तरतूद (रु.लक्ष) |
|---|---|---|
| | (अ)शीर्ष कामे | |
| १ | 'ए' प्राथमिक | ०.५७ |
| २ | 'बी' भूसंपादन | ४०२.८५ |
| ३ | 'सी' मुख्य कामे | १०९.५१ |
| ४ | इंचरणा नदीवरील पुल | ४२.२७ |
| ५ | 'एम'वृक्षारोपण | ०.०० |
| ६ | 'ओ' संकीर्ण | ०.०० |

| अ.क्र. | विवरण | उपशिर्षवार तरतूद (रु.लक्ष) |
|---|---|---|
| ७ | 'पी' देखभाल | ०.०० |
| ८ | 'आर' दळणवळण | ०.०० |
| | **एकूण बांधकाम** | ५५५.२० |
| ९ | अनुषंगीक खर्च | ०.०० |
| | **एकूण किंमत** | **५५५.२०** |

- प्रकल्पाच्या ठळक बाबी खालील प्रमाणे –
  १. सिंचन क्षमता - ३०६ हे. (वसंतवाडी १८५ हे., सावरगाव १०६ हे., मुगाव १५ हे.)
  २. पाणीसाठा - १.४८५ द.ल.घ.मी.
  ३. प्रती सहस्त्र घनमीटर पाणीसाठा किंमत - रु. ३७,३८७.२०/- (मापदंड २८१७४ x ०.८०) = रु. २२,५३९.२०/-)
  ४. लाभव्यय गुणोत्तर - ०.६२ (मापदंड १ पेक्षा अधिक )
  ५. आर्थिक परतावा दर(ERR) - १६.०५ (मापदंड १० पेक्षा जास्त )

वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड योजनेच्या कामावर होणारा खर्च लेखाशिर्ष "४७०२ लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (एक) म.कृ.खो.वि.म. अंतर्गत योजना" या शिर्षाखाली खर्ची घालावा व महामंडळाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

वसंतवाडी साठवण तलाव ता. पाटोदा जि. बीड या योजनेस प्रदान करण्यात आलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (०२/२०२२) अनुक्रमांकावर नोंदवण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे चे नियामक मंडळाच्या १०७ व्या बैठकीतील ठराव क्र.१०७/६ च्या मान्यतेनुसार सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या Mini Web Portal वर उपलब्ध करून देण्यात आला आहे..

MJKulkarni

**स्थळ प्रत मा. का.सं. यांना मान्य**

**( मिनल कुलकर्णी )**
**अधिक्षक अभियंता**

जा.क्र. मकृखोविम/२०७/(५६१/२००७)/प्रबां-२/सुप्रमा/ ०५४८ दिनांक :- २५/०१/२०२२

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१) मा. प्रधान सचिव (जसंप्र व वि) जलसंपदा विभाग मंत्रालय,मुंबई-३२ (लक्षवेध – श्रीमती रेखा भवार, शासनाच्या कक्ष अधिकारी, लपा)
२) मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग पुणे
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी मकृखोविम पुणे
४) अधिक्षक अभियंता व सदस्य सचिव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लगार समिती -२ पुणे
५) अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद
६) कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद
७) रेखा शाखा (महामंडळ ) यांना संग्रहार्थ